Literacy for a Billion

Movie: Porinchi Dhamal Bapachi Kamal
Year: 1987

Song: Yeshil Yeshil Yeshil Rani Pahate
Lyricist: Vasant Bapat

येशील येशील येशील
राणी पहाटे पहाटे येशील
तुझिया माझिया प्रेमाची पावती
साखर चुंबन देशील
येशील येशील येशील
राणी पहाटे पहाटे येशील
तुझिया माझिया प्रेमाची पावती
साखर चुंबन देशील
येशील येशील येशील

ओलेती पहाट शहाऱ्याची लाट
गळयात घालूया बाहू
तुझी हनुवटी जरा उचलता
नको ना रागाने पाहू
प्राजक्त फुलांचा पाऊस झेलीत
मिठीत मिटून जाशील
येशील येशील येशील
राणी पहाटे पहाटे येशील
तुझिया माझिया प्रेमाची पावती
साखर चुंबन देशील
येशील येशील येशील

धुंद यौवनाचा प्रेम जीवनाचा
लाभला सुगंधी झेला
झाले मी बावरी साजणा सावरी
नाजूक फुला अबोला
उन्हात छायेत
प्रेमात मायेत
सदैव संगती नेशील
येशील येशील येशील
राणी पहाटे पहाटे येशील
तुझिया माझिया प्रेमाची पावती
साखर चुंबन देशील
अवेळी तांडव कोसळे मांडव
भुईला लोटली वेली
भुईला लोटली वेली
मिळाला उदार प्रीतीचा आधार
जुईला तरारी आली
आनंद पुरात मंगल सुरात
जन्माचा वसंत होशील
येशील येशील येशील
राणी पहाटे पहाटे येशील
तुझिया माझिया प्रेमाची पावती
साखर चुंबन देशील
येशील येशील येशील
येशील येशील येशील
येशील येशील येशील

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*